निवडणूक तात्काळ

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उमेदवारांना जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१४/प्र.क्र.१/का.८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १८/०३/२०१५

प्रति,

१) प्रधान सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.
२) प्रधान सचिव, महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२.
३) सचिव, आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२.

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागासवर्गीयांसाठी आरक्षित होणाऱ्या प्रवर्गातून लढविण्यास इच्छूक असलेल्या उमेदवारांना त्यांच्या जात प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र वेळेवर उपलब्ध करुन देण्याबाबत.
संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दि.०७/०१/२०१५ चे परिपत्रक.

महोदय,

आपणास ज्ञात असेलच की, या वर्षात ग्रामपंचायतींच्या सर्व जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निवडणुका होणार आहेत (जिल्हा व माहनिहाय मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींची यादी संलग्न).

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागातून निवडणुका लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक करण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत उमेदवारांना त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पुरेसा अवधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभाग रचनेची कार्यवाही साधारणपणे प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वी चार ते सहा महिने अगोदर पूर्ण केली जाते. तथापि निवडणूक कार्यक्रम कधी जाहीर होईल ते सर्वसामान्य नागरिकांना माहित नसते. त्यामुळे सर्वसाधारणपणे आरक्षित प्रभागांची सोडत काढल्यानंतर इच्छूक उमेदवार जात पडताळणीकरीता अर्ज करतात. तथापि राखीव जागांवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्यासाठी पुरेसा अवधी देऊनही जात वैधता

... न आल्याने, ते उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून वंचीत राहतात असे आयोगाच्या निदर्शनास आलेले आहे.

... या वर्षात राज्यात मोठ्या प्रमाणात नियोजित असलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांमध्ये राखीव जागांसाठी इच्छूक उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्राच्या उपलब्धतेअभावी नामनिर्देशनपत्र भरता न आल्याने पदे रिक्त राहू नयेत याकरीता राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून आयोग आपणास असे निर्देश देत आहे की,

४. आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना **दि.०७/०१/२०१५ च्या परिपत्रकाद्वारे** (प्रत आपणास पृष्ठांकित तथापि, सुलभ संदर्भासाठी पुन्हा संलग्न) इच्छूक उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र विनाविलंब उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यासंदर्भात याआधीच निर्देश दिलेले आहेत. संबधित विभागीय आयुक्त यांच्याशी समन्वय साधून त्या विभागातील जिल्ह्यांच्या पातळीवर, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीची विशेष शिबीरे आयोजित करण्यात यावीत.

५. विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या सदस्यांना आठवड्यातील कामकाजाच्या दिवसांपैकी प्रत्येक जिल्ह्यासाठी किमान एक दिवस निश्चित करून त्या दिवशी संबंधित जिल्ह्याच्या ठिकाणी उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावेत, जेणेकरून इच्छूक उमेदवारांचे अर्ज स्विकृत करणे, समितीस प्राप्त झालेल्या अशा अर्जांतील त्रुटींबाबत संबंधिताना जागीच मार्गदर्शन करणे व त्रुटींची पूर्तता करून घेणे, तयार जात वैधता प्रमाणपत्रे संबंधिताना वितरीत करणे, या बाबी पार पाडता पाडणे शक्य होईल.

६. यापुढे असे अर्ज जिल्हाधिकारी यांच्याकडून **विभागीय जात पडताळणी समितीच्या कार्यालयास** प्राप्त होताच सदर **अर्जांवर समितीने प्राथम्याने कार्यवाही करून निर्णय घेण्यात यावा, असे निर्देश सर्व विभागीय समित्यांना आपणाकडून देण्यात यावेत.**

वरील सर्व निर्देशांसदर्भात आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाही संदर्भात आयोगास पत्राद्वारे लवकरात लवकर सूचित करावे, ही विनंती.

आपला,

(डॉ.प्रदीप व्यास)
प्रधान सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव.
२) विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

वरील पत्रातील निर्देश क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार विभागीय जात पडताळणी समितीशी तसेच आपल्या विभागातील जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय साधून जिल्हा स्तरावर जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात दि.२०/०२/२०१५ पर्यंत विशेष शिबीरे आयोजित करण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधितांना आवश्यक ते निर्देश देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीबाबत आयोगास अवगत करावे.

३)जिल्हाधिकारी (सर्व - मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून) यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.